# पंचोपचार आणि षोडशोपचार पूजनामागील शास्त्र

## विषयसूची


卐 संकलकांचा परिचय ६

卐 आध्यात्मिक परिभाषेतील वैशिष्ट्यपूर्ण प्रस्तावना ! ८

卐 मनोगत १०


## ग्रंथाची अनुक्रमणिका


**प्रकरण १ : देवपूजेची सर्वसाधारण माहिती** १२

१. व्याख्या २. निर्मिती १२

३. महत्त्व ४. प्रकार १३

५. काही देवतांच्या पूजनाची वैशिष्ट्ये व त्यांमागील कारण १४

६. देवपूजा दिवसात किती वेळा व कोणत्या समयी करावी ? १६

७. देवपूजा कधी करू नये ? १८

८. देवपूजा कोणत्या दिशेला करावी ? ९. देवपूजा कोणी करावी ? १९

१०. देवपूजा करतांना भाव कसा ठेवावा ? २२

**प्रकरण २ : पंचोपचार पूजन – कृती आणि शास्त्र** २४

१. पंचोपचार पूजनाची कृती २४

२. पंचोपचार पूजनातील कृतींमागील शास्त्र ३१

३. पंचोपचारांचे तुलनात्मक महत्त्व व त्यांचे परिणाम ७०

४. देवपूजेत गंध, पुष्प, धूप, दीप व नैवेद्य हे पाच उपचार असतांना अक्षताही का वहातात ? ७०

**प्रकरण ३ : षोडशोपचार पूजन – कृती आणि शास्त्र** ७२

१. षोडशोपचार पूजनाची कृती ७२

२. षोडशोपचार पूजनातील कृतींमागील शास्त्र ७८

३. षोडशोपचार व पंचोपचार पूजा ८७

४. षोडशोपचार पूजेतील सोळा उपचारांचे तुलनात्मक महत्त्व, परिणाम व वैशिष्ट्ये ८९

**प्रकरण ४ : देवपूजा झाल्यानंतर करावयाच्या कृती आणि त्यांमागील शास्त्र** ९२

**प्रकरण ५ : अन्य माहिती** ९९

१. देवघरात छोट्या तांब्यात पाणी भरून ते दुसऱ्या दिवशी प्यावे, हे तत्त्वतः योग्य असले, तरी कलियुगासाठी अयोग्य असणे ९९

२. मानसपूजा ९९

३. देवपूजेची मर्यादा व जलद ईश्वरप्राप्तीसाठी पुढील टप्प्याची साधना आवश्यक १०१

४. देवतांचे विडंबन रोखणे, ही काळानुसार आवश्यक अशी देवतेची उपासना ! १०२

卐 **प्रस्तुत ग्रंथाच्या विषयासंबंधी सखोल ज्ञान** १०४

## परात्पर गुरु डॉ. आठवले यांच्या आध्यात्मिक उत्तराधिकारी सद्गुरु (सौ.) बिंदा सिंगबाळ आणि सद्गुरु (सौ.) अंजली गाडगीळ यांच्या नावांआधी विशिष्ट आध्यात्मिक उपाधी लावण्यामागील कारण

नाडीपट्टीवाचनाच्या (नाडीभविष्याच्या) माध्यमातून सप्तर्षी सनातनला मार्गदर्शन करतात. १३.५.२०२० या दिवशी सप्तर्षींनी सांगितले, 'यापुढे सद्गुरु (सौ.) बिंदा सिंगबाळ यांना 'श्रीसत्‌शक्ति (सौ.) बिंदा सिंगबाळ' आणि सद्गुरु (सौ.) अंजली गाडगीळ यांना 'श्रीचित्‌शक्ति (सौ.) अंजली गाडगीळ' असेच संबोधावे; कारण या नावांतून दोघींना देवीतत्त्व मिळेल, तसेच याचा लाभ त्यांच्या नावांचा उल्लेख करणाऱ्यांनाही होईल.' सप्तर्षींच्या आज्ञेनुसार तसे संबोधणे चालू केले आहे. यांच्या नावातील संबोधनाविषयी परात्पर गुरु डॉ. आठवले यांनी सांगितले, ''श्रीसत्‌शक्ति' ही भगवंताच्या शाश्वत स्वरूपाशी संबंधित आहे अन् 'श्रीचित्‌शक्ति' ही भगवंताच्या वैश्विक ज्ञानाशी संबंधित आहे.''

## मनोगत

हिंदु धर्मातील सगुण उपासनापद्धतीचा पाया म्हणजे 'देवपूजा'. 'नित्याच्या धावपळीच्या दिनक्रमात देवपूजेसाठी एवढा वेळ आहे कोणाला ?', अशी नकारात्मक मानसिकता हल्ली बऱ्याच जणांमध्ये आढळते. केवळ एक नित्यकर्म पार पाडायचे म्हणून देवावर भरभर पाणी घालून गंधाचा टिळा लावायचा व कोणतेतरी फूल वाहून उदबत्तीने ओवाळायचे आणि 'देवपूजा झाली', अशी स्वतःची समजूत करून घ्यायची, असे चित्र आज दिसून येते. सर्वांच्या पालनपोषणाची काळजी वहाणाऱ्या भगवंताची पूजा अशा प्रकारे 'उरकणे', याला देवपूजा म्हणता येईल का ? असे केल्यावर भगवंताने आपल्यावर कृपा तरी का करावी ? घरी येणाऱ्या अतिथीचे स्वागत जसे आपण आदरपूर्वक करतो, तसेच देवाचे केले, म्हणजेच देवाची यथासांग पूजा केली, तरच तो आपल्यावर प्रसन्न होऊन आपल्याला भरभरून आशीर्वाद देतो. यासाठीच धर्मशास्त्रात देवाचे आवाहन करणे, त्याला बसण्यासाठी आसन देणे, त्याला चरण धुण्यासाठी पाणी देणे यांसारखे क्रमवार सोळा उपचार शिकवून त्या माध्यमातून विधीवत भावपूर्ण धर्माचरण करण्यास शिकवले आहे. १६ उपचारांपैकी पुढील उपचार – ९. गंध लावणे, १०. फूल वाहणे, ११. धूप दाखवणे, १२. दीप ओवाळणे व १३. नैवेद्य दाखवणे, या पाच उपचारांना 'पंचोपचार' असे म्हणतात. सोळा उपचारांद्वारे देवपूजा करणे शक्य नसल्यास पाच उपचारांनी केली तरी चालते. बऱ्याच जणांना षोडशोपचारे पूजा करणे शक्य होत नसल्याने त्यांना पंचोपचार पूजेची माहिती पहाणे सोपे जावे, यासाठी ग्रंथात आधी पंचोपचार व नंतर षोडशोपचार पूजनाची माहिती दिली आहे.

आपल्या त्रिकालदर्शी ऋषीमुनींनी धर्मशास्त्रात सांगितल्याप्रमाणे देवपूजा केल्यासच त्यांच्या संकल्पशक्तीचा आपल्याला लाभ मिळतो. देवपूजा धर्मशास्त्रानुसार करतांनाच भक्तीभावासह करणेही तितकेच महत्त्वाचे असते. देवपूजेत भगवंताविषयीच्या प्रेमाचा, भावाचा ओलावा नसेल, तर ती पूजा भगवंतापर्यंत पोहोचत नाही; कारण भगवंत भावाचा भुकेला आहे. सर्वसामान्य भाविकात भाव अकस्मात निर्माण होणे कठीण

असते; पण देवपूजेतील विविध कृतींमागील शास्त्र समजून घेतल्यास देवपूजेविषयी, पर्यायाने देवाविषयी श्रद्धा निर्माण होऊन त्याचे रूपांतर भावात व्हायला साहाय्य होते. यासाठी ग्रंथात प्रामुख्याने देवपूजेतील कृतींमागील अध्यात्मशास्त्र सांगण्यावर भर दिला आहे.

देवतेचे आवाहन करतांना मूर्तीवर अक्षता किंवा तुळशीदल का वहावे, अर्घ्य देतांना पाण्याबरोबर गंध, पुष्प व अक्षता का वहातात, देवाला अभिषेक करतांना सुगंधी द्रव्याचा वापर का करावा, देवाला प्रथम गंध लावून नंतर हळद-कुंकू का वहावे, देवाला नैवेद्य दाखवतांना नैवेद्याचे पान कसे ठेवावे इत्यादी अनेक प्रश्नांची बुद्धीपलीकडील शास्त्रीय उत्तरे या ग्रंथात दिली आहेत. त्याचबरोबर कोणत्या देवतेला कोणती फुले वहावीत, देवतांना फुले वहातांना ती विशिष्ट संख्येत व रचनेत वहाण्यामागचे शास्त्र काय, देवतेला किती उदबत्त्यांनी ओवाळावे यांसारख्या नाविन्यपूर्ण ज्ञानाचाही समावेश ग्रंथात केला आहे.

धार्मिक विधींत असलेली इतकी शास्त्रशुद्ध गहनता हिंदु धर्माशिवाय अन्य कोणत्याही पंथात नाही. यावरूनच हिंदु धर्माचे निर्विवाद श्रेष्ठत्व लक्षात येते.

ग्रंथात दिलेले शास्त्र समजून घेऊन त्यानुसार सर्वांकडून देवपूजा भावपूर्णरीत्या घडो व त्याद्वारे त्यांना अधिकाधिक ईश्वराचा कृपाप्रसाद लाभो, ही श्री गुरुचरणी प्रार्थना. – **संकलक**

## वाचकांना विनंती

सनातनच्या साधकांना ईश्वरी कृपेमुळे ज्ञान मिळण्याच्या प्रक्रियेचा वेग प्रचंड असल्याने, साधकांकडून ज्ञान ग्रहण करण्यात क्वचित एखादी चूक रहाण्याची शक्यता असते. वाचकांना ज्ञानाच्या योग्यतेविषयी काही शंका वाटल्यास त्यांनी ती कारणासह पत्राद्वारे किंवा संगणकीय पत्राद्वारे (इ-मेलद्वारे) आमच्या लक्षात आणून द्यावी, ही विनंती. ग्रंथाच्या पुढील आवृत्तीत या संदर्भात योग्य ती सुधारणा करण्यात येईल. – **प्रकाशक**